संदर्भ :- १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण-१००८/प्र.क्र.८/कोषा.प्र.-५ दि.३१/१०/२००८
२) या कार्यालयाचे पत्र क्र.नोंमनि/का.७/GRAS/४३४/१० दि.१६/११/२०१०
३) या कार्यालयाचे पत्र क्र.का.५/GRAS PASSWORD/१२०१/११ दि.२९/८/२०११
४) व्हर्च्युअल ट्रेझरी यांचे पत्र क्र.व्हर्च्यअल ट्रेझरी/नं.८४/२०११/२६३/६२९३ दि.२९/९/२०११ व दि.१४/११/२०११
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकिर्ण १००९/प्र.क्र.३२/कोषा प्र-५ दि.१६ डिसेंबर २०११
६) शासन अधिसूचना महसुल व वन विभाग क्रमांक. मुद्रांक २०१२/३०/प्र.क्र.१८/म-१ दि.२४/७/२०१३
७) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.५/ई-पेंमेट/ई-एसबीटीआर/प्र.क्र. दि.६/१०/२०१३

---

क्र.का.१२/परि./ई-भरणा/परतावा/230/98
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन प्रशासकीय इमारत , पुणे १
दिनांक :- 3 /३/२०१४

## परिपत्रक

**विषय :- ई-भरणा (e-payment) द्वारे भरणा केलेल्या मुद्रांक शुल्क , नोंदणी फी चा परतावा देण्याबाबत**

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ६९ चे पोट कलम (२) चा खंड (ग) आणि पोट कलम (३) च्या परंतुकानुसार मुद्रांक शुल्क , नोंदणी फी व इतर रकमांचा भरणा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने करणेसाठी व तद्नुषंगाने परताव्यासाठी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक मुद्रांक २०१२/३०/प्र.क्र.१८/म-१ दि.२४/७/२०१३ रोजी महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ ही नियमावली निर्गमित केली आहे.

**अ) ई भरणा करणेबाबत :-**

महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ मधील नियम ३ अन्वये पक्षकाराने मुद्रांक शुल्क , नोंदणी फी व इतर रकमांचा ई- भरणा प्राधिकृत सहभागी बँकामार्फत शासकीय जमा व लेखा प्रणाली (ग्रास) द्वारे आभासी कोषागारात करण्याची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

**ब) ई-भरणा विरुपित (Deface) करणेबाबत :-**

i) महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ मधील नियम ३ अन्वये संलेखातील भरणा करणाऱ्या व्यक्तीने ई-भरणा करुन नियम ४ नुसार प्राप्त करुन घेतलेली साधी पावती मुद्रांक खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आंत नियम ४ व नियम १३ मध्ये नमुद नोंदणी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांचेकडून विरुपित करुन घेणे आवश्यक आहे.

**अ)** ई-भरणा करुन मुद्रांक खरेदी करण्यात आलेले असतील परंतु वापरलेले नसतील ( विरुपित न केलेले) अथवा खरेदीच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीत परतावा मागणी न केल्यास असे मुद्रांक महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ५२ (ब) नुसार व महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ मधील नियम ४ (छ) नुसार विहित कालावधीत विरुपित न केल्यास विधीअग्राह्य (invalid) ठरतील.

**ब) (i)** ई-भरणा करुन साधी पावती किंवा ई-चलनाचे माध्यमातून मुद्रांक खरेदी करुन दस्तऐवज निष्पादित केला असल्यास परंतु सदर दस्तऐवज नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार अ.नं.(i) मध्ये नमूद कालावधीत नोंदणीसाठी सादर करणे शक्य नसल्यास व महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४८ (१) मधील तरतुदीनुसार परतावा मिळणेसाठी उक्त कालावधीत अर्ज मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे शक्य नसल्यास अशी साधी पावती किंवा ई-चलन ज्या कार्यालयाच्या नांवे भरणा करणेत आले आहे अशा कार्यालयाकडून महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ मधील नियम ४ च्या तरतुदीनुसार विहित कालावधीत विरुपित (defaced) करुन तसा शेरा समुचित अधिकारी (proper officer) यांचेकडून करुन घेणे बंधनकारक राहील. सदर शेऱ्यामध्ये " सदरचे चलन विरुपित केले आहे परंतु नोंदणीकरीता वापरलेले नाही "("Defaced but not used for registration") असे नमूद करण्यात येईल आणि समुचित अधिकारी त्याखाली स्वाक्षरी करील. तसेच असा संलेख मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३१ व ३३ अन्वये योग्य मुद्रांकीत असलेचे मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.का.५/मुद्रांक-११/प्र.क्र.१४/११ दि.२२/७/२०११ पहावी.

(ii) नियम ६ अन्वये प्राधिकृत सहभागी बँकेच्या ऑनलाईन सुविधेचा वापर करुन अथवा प्राधिकृत सहभागी बँकेच्या काऊंटरद्वारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी रक्कम शासनाच्या आभासी कोषागारात जमा करुन नियम ६ (ख) अन्वये प्राधिकृत सहभागी बँकेद्वारा ई-भरणा करणारी व्यक्ती ई-एसबीटीआर प्राप्त करुन घेऊ शकते. ई-एसबीटीआरचा संलेख नोंदणी अधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यास त्यांनी बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांचे स्वाक्षरीने अगोदरच अधिप्रमाणित केलेला ई-एसबीटीआर नियम ६ (ठ) व १३ (ख) मधील तरतुदीनुसार विरुपित करुन साक्षांकीत करणे आवश्यक आहे.

iii) नियम ४ व नियम ६ चे परंतुकाप्रमाणे एकात्मिक मुद्रांक नोंदणी माहिती तंत्रज्ञान प्रशासन (आय सरिता) या प्रणालीद्वारे साधी पावती व ई-एसबीटीआर बाबतचे चलन आपोआप विरुपित झालेले असेल तेव्हा समुचित अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेला विरुपित केल्या बाबतचा शेरा पुरेसा असेल.

iv) शासन निर्णय, वित्त विभाग निर्णय दि.३१/१०/२००८ नुसार ई-भरणा (e-payment) विरुपित (deface) करणेचे अधिकार कार्यालयीन अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांना असतील असे नमूद केले आहे.

v) अदाकर्त्याने जर शासकीय रकमेचा भरणा हा योग्य त्या लेखाशिर्षाखाली/योजनेखाली केला असल्यास परंतु कार्यालय निवडताना चुकीचे निवडले आहे अशा प्रसंगी ज्या कार्यालयास प्रदान केले आहे त्यांचेकडून चलन विरुपित (deface) करुन घेऊन ज्या कार्यालयाकडून सेवा पुरविणे अपेक्षित आहे अशा कार्यालयाने सेवा पुरवावी असे आभासी कोषागार यांनी संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये कळविले आहे.

**क) परतावा अर्ज करण्याची पध्दत :-**

**i) ई-भरणा केलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा :-**

ई-भरणा (e-payment) द्वारे मुद्रांक शुल्काची रक्कम आभासी कोषागारात प्राधिकृत सहभागी बँकामार्फत शासनास जमा करुन प्राप्त करुन घेतलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्याबाबत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ व संदर्भ क्र.५ मधील नियम १४ मधील तरतुदीनुसार संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी, यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठीचा अर्ज या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.१२/ मु.प./परि./ऑनलाईन परतावा/७/१४ दि.३/१/२०१४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-भरणा (e-payment) करणाऱ्या अर्जदाराने देखील ऑनलाईन परतावा प्रणालीवर व संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकड अर्ज करणे आवश्यक राहील.

**अ)** निष्पादित किंवा अनिष्पादित परंतु अनोंदणीकृत दस्तऐवजासंबंधी परतावा प्रकरणांचे बाबतीत परतावा अर्ज ऑनलाईन सादर करुन नमुना ए-१ मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करावा.

**ब)** नोंदणीकृत दस्ताबाबत परतावा अर्ज ऑनलाईन सादर करुन नमुना **ए-२** मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज दाखल करावा.

**ii) ई-भरणा केलेल्या नोंदणी फी चा परतावा :-**

नोंदणी आदेश संहिता भाग-२ संहिता क्र.६५१ नुसार नोंदणी फी चा परतावा अर्ज संबंधित सह जिल्हा निबंधक /दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक आहे. तसेच नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८० (अ) (२) नुसार जादा भरलेल्या नोंदणी फीचा परतावा मिळणेबाबत सबंधित जिल्हयाचे सह जिल्हा निबंधक व मुंबई विभागाकरीता दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय अधिकारी, मुंबई व बांद्रा यांच्याकडे परतावा अर्ज नमुना **बी** मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

**iii) मुद्रांक शुल्क व नोंदणी फी एकत्रितरित्या ई-भरणा केलेल्या रकमांचा परतावा :-**

ई-भरणा (e-payment) द्वारे मुद्रांक शुल्क व नोंदणी फी ची रक्कम प्राधिकृत सहभागी बँकामार्फत आभासी कोषागारात एकत्रित जमा केली असल्यास सदर रकमांचा परतावा देण्याकरीता उपरोक्त परिच्छेद क (i) व (ii) मध्ये अर्ज करण्याची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे.

परंतु ई-भरणाद्वारे (e-payment) मुद्रांक शुल्क व नोंदणी फी एकत्रितरित्या आभासी कोषागारात रक्कम जमा केली असेल अशा प्रकरणी नोंदणीकृत न केलेल्या दस्ताबाबत, मुंबई विभागात मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा परतावा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी द्यावा मात्र नोंदणी फी चा परतावा दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय अधिकारी यांचे पडताळणीनंतर महसुली परतावा म्हणून देणे आवश्यक आहे. मात्र मुंबई विभागा व्यतिरिक्त इतर विभागात सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनीच नोंदणी फी चा परतावा महसुली परतावा म्हणून देणे आवश्यक आहे.याबाबत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी परताव्यासाठी अर्ज नमुना **सी** मध्ये सादर करणे आवश्यक राहील.

**ड) ई-भरणा (e-payment) चा परतावा करताना विभागाने अवलंबिण्याची कार्यपध्दती -**

१) ग्रास किंवा ई-भरणाद्वारे आभासी कोषागारात जमा केलेल्या रकमांचा परतावा मंजूर करताना प्रकरणासोबत जोडलेल्या चलनावरुन अर्जदार यांनी परतावा मागणी केलेली रक्कम शासनास जमा झाल्याची ग्रास प्रणालीवरुन खात्री करुन घ्यावी, जमेची खात्री करताना चलनावरील GRN, Bank CIN व Bank scroll No, Date इ.बाबी तपासाव्यात. तसेच ग्रास प्रणाली व्यतिरिक्त स्थावर मालमत्तेसंबंधी व्यक्तीगत माहितीवरुन ई-सर्च घेऊन सदर चलनाचा वापर झाले आहे किंवा कसे याची खात्री करावी.

२) ग्रास किंवा ई-भरणाद्वारे आभासी कोषागारात जमा केलेल्या ई-चलनाचा परतावा मागणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रथमतः सदर ई-चलनाचा वापर झाला आहे का, चलनाचा वापर नोंदणीसाठी करण्यात आला आहे का, सदरचे चलन विरुपित (defaced) करण्यात आले आहे किंवा नाही, तसेच सदरचे चलन यापूर्वी परताव्यासाठी सादर करण्यात आले होते किंवा नाही (Refunded or not) याची पडताळणी करावी. तद्नंतर भरणा केलेल्या पूर्ण रक्कमेसाठी सेवा पुरविली नसल्यास, तरीही अंशतः किंवा पूर्ण रकमेच्या परताव्याची मागणी केल्यास भरणा केलेल्या रक्कमेसाठी सेवा पुरविली नाही (service not rendered/not refunded earlier) अशी नोंद चलनावर घ्यावी. अशी नोंद घेण्याची सुविधा ग्रास/ ई-भरणा प्रणालीमध्ये सध्या नाही. तथापि अशा आशयाचे लेखी प्रमाणपत्र देयके सादर करणाऱ्या कार्यालयाने ई-चलनावर द्यावे.

३) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ५२ नुसार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, अपर मुद्रांक नियंत्रक, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे परतावा मंजूरीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयांना दिलेल्या ग्रास प्रणालीच्या लॉग इन आयडी व पासवर्ड चा वापर करुन परतावा करावयाच्या मूळ चलनावर परतावा करण्याची नोंद प्रणालीवर व परतावा नोंदवहीत घेणे ही जबाबदारी संबंधित देयक सादर करणाऱ्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याची राहील.

४) ग्रास किंवा ई-भरणा चलनाच्या पूर्ण रकमेपैकी अंशतः रकमेचा परतावा करण्याची सुविधा ग्रास प्रणालीवर उपलब्ध आहे. अंशतः परतावा (partially Refund) प्रकरणी परताव्याची नोंद ग्रास प्रणालीवर कितीही वेळा घेता येईल सदर चलनाची प्रत मुद्रीत करुन प्रकरणासोबत जोडावी.

५) स्थावर मालमत्तेच्या विक्री करारास ग्रास/ई-भरणा प्रणालीद्वारे अनुच्छेद २५ च्या तरतुदीनुसार मुद्रांकाची रक्कम भरुन सदर करार नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत केला असेल त्यावेळी या विभागाकडून रक्कम अदाकर्त्यास चलन विरुपित (deface) करुन सेवा पुरविली जाते. मात्र मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४८ (१) च्या परंतुकानुसार उक्त करार नोंदणीकृत रद्दलेखाद्वारे रद्द करुन अशी प्रकरणे परताव्यासाठी दाखल होतात.अशा प्रकरणी ई-चलनावर claimed for refund ची नोंद घेणे आवश्यक राहील. सदर तरतुदीचा वापर फक्त स्थावर मालमत्तेचे विक्री करारास (अनुच्छेद २५) लागू राहील.

६) जेवढया रक्कमेसाठी परताव्याची मागणी केली आहे त्या रक्कमेतून मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ५२ व मुंबई मुद्रांक नियम २२ मधील तरतुदीनुसार तसेच शासन निर्णय, महसूल व वन विभाग,म-१, मुंबई दि.९/६/२००८ व ८/७/२००८ तसेच शासन अधिसूचना क्रमांक मुद्रांक २०१२/३०/ प्र.क्र.१८/ म-१ दि.२४/७/२०१३ अन्वये निर्गमित केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक शुल्काचा ई-भरणा आणि परतावा नियम २०१३ मधील नियम १४(ग) अन्वये वजावटीची रक्कम विरुपित (defaced) करुन देय असलेली निव्वळ परतावा रक्कमेची नोंद ई-चलनावर claimed for refund म्हणून ग्रास प्रणालीद्वारे घेण्यात यावी.

वरील सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी करुन परतावा प्रकरणाबाबत कार्यवाही करणेत यावी.

**सही/- XXX**
**(डॉ. श्रीकर परदेशी)**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.
२) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती, नागपूर.
३) सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी , सर्व सह जिल्हा निबंधक, दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय अधिकारी, मुंबई व त्यांचे अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक.
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

**निर्गमित**

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा**
**मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

# Form A-1

## Application Form for refund of Stamp Duty paid by e-payment (Executed or non Executed but not Registered document)

**Office Name :- Collector of Stamps . . . . . . . . . . .**

Online application Code No-: ______ Date-: ______

1) Party details:-

Name of Applicant-: ______

Applicant Address-: ______

Mobile No-: ______ Landline-: ______

E-mail ID-: ______

Bank Name-: ______

Account No-: ______ ISFC Code-: ______

2) Stamp Details

2.1 Type of Stamp Duty -:

Non Judicial

(i) ☐ Simple Receipt/e-challan

(ii) ☐ e-SBTR

2.2 E-payment details of stamp duty -:

2.2.1 **Simple Receipt/e-challan/e-SBTR** -:

a) Bank CIN No. & Date ______ ______

b) GRN No.& Date ______ ______

b)(i) e-Payment Amount -:

Stamp Duty Rs. ______

**ii) e-SBTR (additional information)** -:

( if applicable)

a)Name of Sub Agent(if applicable)- ______

Issuing Bank Name ______

Issuing Bank Address ______

b) e-SBTR Stationary No. [ ]

3) Document Details-: ( √ fill particular option given below )

I. ☐ Non Executed

II. ☐ Executed

Type of Document-: [ ]

Date of Execution-: [ ]

3) Reason for Stamp duty refund-: [ ]

4) Following documents have been attached-:

i) ☐ e-SBTR/Simple Receipt/e-challan with original document

ii) ☐ Affidavit by the applicant about refund.

iii) ☐ Statement to be made by the applicant.

iv) ☐ No objection Certificate (if there are more purchaser in the document and only one purchaser has applied for refund then NOC of the remaining purchaser)

v) ☐ Stamp purchaser Affidavit/NOC (if stamps are purchased **on behalf** of applicant by some another person)

vi) ☐ Power of attorney/Authority letter (if applicable)

Place : Signature

Date: Name of Applicant

# Form A-2

## Application Form for refund of Stamp Duty paid by e-payment (Registered document)

**Office Name :- Collector of Stamps . . . . . . . . . . .**

Online application Code No-: ______ Date-: ______

1) Party details:-

Name of Applicant-: ______

Applicant Address-: ______

Mobile No-: ______ Landline-: ______

E-mail ID-: ______

Bank Name-: ______

Account No-: ______ ISFC Code-: ______

2) Stamp Details

A) Type of Stamp Duty -:

Non Judicial

(ii) ☐ Simple Receipt/e-challan

(ii) ☐ e-SBTR

B) E-payment details of stamp duty -:

**i) Simple Receipt/e-challan/e-SBTR** -:

a) Bank CIN No. & Date ______ ______

b) GRN No.& Date ______ ______

c) Defacement No. & Date ______ ______

d) Name of the defacing authority -: ______

**ii) e-SBTR related information**-:

( if applicable)

a)Name of Sub Agent(if applicable)- ______

Issuing Bank Name ______

Issuing Bank Address ______

b) e-SBTR Stationary No.

c) e-Payment Amount -:

Stamp Duty Rs.

3) Document Details-:

Type of Document-:

Date of Execution-:

Registered Document Number-: Date-:

Name of Subregistar office-: Dist-:

Cancellation Document No-: Date-:

Name of Subregistrar office-: Dist-:

4) Reason for Stamp duty refund-:

5) Following documents have been attached-:

i) ☐ e-SBTR/Simple Receipt/e-challan with original document

ii) ☐ Affidavit by the applicant about refund.

iii) ☐ Statement to be made by the applicant.

iv) ☐ No objection Certificate (if there are more purchaser in the document and only one purchaser has applied for refund then NOC of the remaining purchaser)

v) ☐ Stamp purchaser Affidavit/NOC (if stamps are purchased **on behalf** of applicant by some another person)

vi) ☐ Power of attorney/Authority letter (if applicable)

Place : Signature

Date: Name of Applicant

# Form B

## Application Form for refund of Registration Fee paid by e-payment

**Office Name :- Joint District Registrar/Sub Registrar & Admn.Officer . . . . . . . . . . .**

Online application Code No-: ______ Date-: ______

1) Party details:

Name of Applicant-: ______

Applicant Address-: ______

Mobile No-: ______ Landline-: ______

E-mail ID-: ______

Bank Name-: ______

Account No-: ______ IFSC Code -: ______

2) Details of Registration Fee paid by e-payment -:

**(i) Simple Receipt/e-challan -:**

a) Bank CIN No. & Date ______ ______

b) GRN No.& Date ______ ______

c) Defacement No. & Date ______ ______

d) Name of the defacing authority - ______

**(ii) For Simple Receipt -:**

Issuing Bank Name ______

Issuing Bank Address ______

e-Payment of Registration Fee -: ______

2) Document Details-:

Type of Document-: ______

Date of Execution-: ______

Registered Document Number-: ______ Date-: ______

Name of Subregistar office-: ______ Dist-: ______

4) Reason for Registration Fee refund-:

5) Following documents have been attached-:

i) ☐ Simple Receipt/e-challan with original document

ii) ☐ Affidavit by the applicant about refund.

iii) ☐ Statement to be made by the applicant.

iv) ☐ No objection Certificate (if there are more purchaser in the document and only one purchaser has applied for refund then NOC of the remaining purchaser)

v) ☐ Stamp purchaser Affidavit/NOC (if stamps are purchased **on behalf** of applicant by some another person)

vi) ☐ Power of attorney/Authority letter (if applicable)

Place : Signature

Date: Name of Applicant

# Form C

## Application Form for refund in case of combined e-payment of Stamp Duty & Registration Fee

**Office Name :- Collector of Stamps . . . . . . . . . . .**

Online application Code No-: ______ Date-: ______

1) Party details:

Name of Applicant-: ______

Applicant Address-: ______

Mobile No-: ______ Landline-: ______

E-mail ID-: ______

Bank Name-: ______

Account No-: ______ ISFC Code-: ______

2) Stamp Details

A) Type of Stamp Duty-:

Non Judicial

(i) ☐ Simple Receipt/e-challan

(ii) ☐ e-SBTR

B) e-payment details of stamp duty-:

i) <u>Simple Receipt</u> /e-challan/e-SBTR-:

a) Bank CIN No. & Date ______ ______

b) GRN No.& Date ______ ______

c) Defacement No. & Date ______ ______

d) Name of the defacing authority - ______ ______

**ii) <u>e-SBTR related information</u>-:**

( if applicable)

a) Name of Sub Agent(if applicable)- ______

b) Issuing Bank Name ______

Issuing Bank Address ______

d) e-SBTR Stationary No. [ ]

e) e-Payment amount -:

i) Stamp Duty Rs. [ ]

ii) Registration Fee Rs [ ]

3) Document Details-: ( √ fill particular option given below )

i. ☐ Non Executed
ii. ☐ Executed
Iii ☐ Registered And Cancelled.

Type of Document-: [ ]

Date of Execution-: [ ]

Registered Document Number-: [ ] Date-: [ ]

Name of Subregistar office-: [ ] Dist-: [ ]

Cancellation Document No-: [ ] Date-: [ ]

Name of Subregistrar office-: [ ] Dist-: [ ]

4) Reason for refund of Stamp -: Duty & Registration Fee [ ]

5) Following documents have been attached-:

i) ☐ e-SBTR/Simple Receipt/e-challan with Original document
ii) ☐ Affidavit by the applicant about refund.
iii) ☐ Statement to be made by the applicant.
iv) ☐ No objection Certificate (if there are more purchaser in the document and only one purchaser has applied for refund then NOC of the remaining purchaser)
v) ☐ Stamp purchaser Affidavit/NOC (if stamps are purchased **on behalf** of applicant by some another person)
vi) ☐ Power of attorney/Authority letter (if applicable)

Place :

Signature

Date:

Name of Applicant